



मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३०३ वा ● शुक्रवार, ता. ९ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



पेस्ट कंट्रोल

झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.

या सारख्या किटकांपासुन मुक्तता.

औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.

शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.

अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल

जेऊर (बा.), अहिल्यानगर.

संदीप पवार - 98 23 75 17 76


# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १०० दिवस सुधारणा विजेत्यांचा गुणगौरव

**मुंबई । शफीक बागवान**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसात सुधारणा करणाऱ्या कार्यक्रमांतर्गत यशस्वी विजेत्या कार्यक्षम अधिकाऱ्यांचा नुकताच सत्कार केला आहे. सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे विनायक महामुनी, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे वैभव वाघमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम सर्वोत्तम जिल्हाधिकारी कार्यालय विनय गौडा जी. सी., जिल्हाधिकारी, चंद्रपूर अमोल येडगे, जिल्हाधिकारी, कोल्हापूर आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी, जळगाव अजित कुंभार, जिल्हाधिकारी, अकोला राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी, नांदेड सर्वोत्तम पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर नीलोत्पल, पोलीस अधीक्षक, गडचिरोली हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण) महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रामीण) सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त मनिषा अव्हाळे, आयुक्त, उल्हासनगर शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल डॉ. कैलास



शिंदे, आयुक्त, नवी मुंबई सर्वोत्तम पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मीरा भाईंदर, अशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे, डॉ. रविंद्र शिसवे, पोलीस आयुक्त, मुंबई रेल्वे सर्वोत्तम पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक / उपमहानिरीक्षक संजय दराडे, परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक, कोकण शहाजी उमाप, परिक्षेत्र पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड सर्वोत्तम विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, विभागीय आयुक्त, कोकण डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त, नाशिक विजयलक्ष्मी बिदरी, विभागीय आयुक्त, नागपूर सर्वोत्तम आयुक्त / संचालक डॉ. विनोद मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण डॉ. सुहास दिवसे, आयुक्त, जमाबंदी लीना बनसोड, आयुक्त, आदिवासी विकास निलेश सागर, मुख्य कार्यकारी अधिकारी, महा. राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राजीव निवतकर, आयुक्त, वैद्यकीय शिक्षण सर्वोत्तम मंत्रालयीन विभाग अनुपकुमार यादव, सचिव, महिला व बाल विकास विभाग मनीषा पाटणकर-म्हैसकर, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग विकासचंद्र रस्तोगी, प्रधान सचिव, कृषी विभाग एकनाथ डवले, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग संजय सेठी, अपर मुख्य सचिव, परिवहन व बंदरे विभाग अभिनंदन पत्र यादी मंत्रालयीन विभाग १०० % उद्दिष्ट पूर्ण दिपक कपूर, अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग इक्बालसिंह चहल, अपर मुख्य सचिव, गृह विभाग विकास खारगे, अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग इक्बालसिंह चहल, अपर मुख्य सचिव, खनिकर्म विभाग संजय सेठी, अपर मुख्य सचिव, बंदरे विभाग एकनाथ डवले, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग वेणुगोपाल रेड्डी, अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग आय.ए. कुंदन, प्रधान सचिव, कामगार विभाग अंशु सिन्हा, प्रधान सचिव, वस्त्रोद्योग विभाग एन. रामास्वामी, सचिव, पशुसंवर्धन विभाग एन. रामास्वामी, सचिव, दुग्धव्यवसाय विभाग गणेश पाटील, सचिव, रोजगार हमी योजना विभाग ९० % उद्दिष्ट पूर्ण आभा शुक्ला, अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग राजेश कुमार मीना, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग संजय सेठी, अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग सोनिया सेठी, अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन विभाग रणजित सिंह देओल, प्रधान सचिव, शालेय शिक्षण डॉ. पी. अनबलगन, सचिव, उद्योग विभाग धीरज कुमार, सचिव, अन्न, औषध प्रशासन विभाग सेवाकर्मी पुरस्कार कार्यक्रम विगतवारी - मंजूर पदसंख्या १०००० पेक्षा जास्त मनिषा पाटणकर-म्हैसकर, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग मनिषा वर्मा, अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग शैला ए., सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त (राज्यकर) विभाग विगतवारी - मंजूर पदसंख्या ३००० ते १०००० डॉ. रिचा बागला, प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) विनीता वैद सिंगल, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव, गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क) विगतवारी - मंजूर पदसंख्या ३००० पेक्षा कमी असीमकुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव, नगरविकास विभाग (नवि-१) एकनाथ डवले, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग आदींचा सत्कर करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संबंधित अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# कुंभमेळाव्याच्या पार्श्वभूमीवर शिंगणापूरात शासकीय अधिकाऱ्यांची बैठक - बानकर

**सोनई । विजय खंडागळे**

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगर येथे जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्याची बैठकीत झालेल्या कुंभमेळाव्याच्या निमित्ताने बैठक पार पडली. पार्श्वभूमीवर नेवासा येथील तहसीलदार डॉ. संजय बिराजदार व पंचायत समितीचे बिडिओ संजय लखवाल यांच्यासह अनेक शासकीय अधिकाऱ्यांची सुविधांची पाहणी करणार असून शनिशिंगणापूर येथे बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती शनिशिंगणापूरचे सरपंच बाळासाहेब बानकर यांनी दिली.

नाशिक त्रिंबकेश्वर येथे २७-२८ मध्ये होणाऱ्या कुंभमेळाव्याच्या तयारी निमित्त शिर्डी व शनिशिंगणापूर परिसरातील प्रसिद्ध देवस्थाने तसेच भाविकाचा लोंढा पाहता दर्शन व सुविधा मिळण्यासाठी सरकारी यंत्रणांकडून पायाभूत सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून शनैश्वर देवस्थान व शिर्डी येथे लागणाऱ्या सुधारीत खर्चाचा आराखडा प्रस्तावासाठी समक्ष पाहणी करणार आहे. यासाठी सुविधांमध्ये अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी हेलिपॅड, भक्तनिवास, वाहन पार्किंग, देवस्थान सलग्न रस्ते, शौचालय, पिण्याची पाण्याची व्यवस्था, स्ट्रीट लाईट, रस्ता रुंदीकरण, मजबुतीकर आदींबाबत तातडीने प्रस्ताव मागवला आहे. यासाठी शुक्रवारी ता.९ मे रोजी शनिशिंगणापुरात शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत अध्यक्ष भागवत बानकर व सरपंच बाळासाहेब बानकर हे आवश्यक त्या सुचना करतील.

शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ, शनिशिंगणापूर ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या संयुक्त चर्चेसाठी प्रमुख उपस्थितीत पार पाडणार आहे. बैठकीत होणाऱ्या पायाभूत सुविधांची, विकासकामांची चर्चा करून जिल्हाधिकारी यांच्याकडे सुधारित आराखडा प्रस्ताव सादर करण्याचा योजना आखली जाणार आहे. २०२४ मध्ये नाशिक, त्रिंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभ मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर ध्वजारोहण व २७/२८ सालामध्ये कुंभमेळाव्याची सांगता होत असल्याची माहिती अध्यक्ष भागवत बनकर व सरपंच बाळासाहेब बानकर यांनी दिली. या अगोदर शनिशिंगणापूरसाठी आवश्यक त्या सूचना व विकसित बाबीबाबत प्रस्ताव सुचवण्यात आले. मात्र राज्यसरकारचे या परिसरातील या मार्गावरील देवस्थानावर विशेष लक्ष असल्याने जिल्हाधिकारी यांनी गतिमान पाऊल उचलले आहे. या मार्गावरील वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने अतिक्रमण मुद्दा जिल्हाधिकारी यांनी लक्षकेंद्रीत केल्याने वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला.



**श्रीशनैश्वर देवस्थानमधील कार्यरत कामगारांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पुढाकार घेण्याची विनंती आहे. तसेच बैठकीत यावर विचारविनिमय होणे आवश्यक आहे. कुंभमेळ्यामध्ये भाविकांना सुखसुविधा देताना कर्मचाऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग महत्वाचा असतो. परंतु त्यांचे प्रलंबित प्रश्न प्रशासन आणि व्यवस्थापन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे तसेच सरकार दरबारी अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. आजच्या सरकारी अधिकारी, ग्रामपंचायत आणि देवस्थानच्या पदाधिकारी संयुक्त बैठकीमधे विकासकामांसोबत देवस्थान कर्मचारी यांनाही सहभागी करून त्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा होणे आवश्यक आहे, असे देवस्थान कर्मचारी युनियनचे ठाम मत आहे.**

**मेजर श्यामसुंदर शिंदे**
अध्यक्ष, श्रीशनैश्वर देवस्थान
कर्मचारी युनियन, शिंगणापूर


**जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया हे सुधारित आराखडा प्रस्ताव तपासून पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. विठ्ठलराव लंघे आदीच्या उपस्थित लवकरच आराखडा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी संयुक्त बैठक घेतील**

**सरपंच बाळासाहेब बानकर**
शनिशिगणापुर

# राष्ट्रवादी माजी सैनिकसेल सिंदूर ऑपरेशनसाठी सज्ज- प्रदेशाध्यक्ष शिर्के

**पुणे । प्रतिनिधी**

आतंकवादी हल्ल्यास प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारने दहशतवादा विरोधात सुरू केलेल्या सिंदूर ऑपरेशनला समर्थनार्थ आणखी ताकत देण्याच्या उद्देशाने तसेच ऑपरेशन यशस्वी करण्यासाठी, साथ देण्यासाठी संपुर्ण देशासह महाराष्ट्र व पुणे जिल्ह्यातील माजीसैनिक प्रत्यक्ष युद्धात किंवा सेकंड लाईन मदतीसाठी सक्षम असून प्रत्यक्ष युद्धात तसेच हवाई हल्ला झाल्यास युध्दपूर्व अभ्यासात मॉक ड्रीलचा अनुभव असलेले माजी सैनिक राज्य सरकार व भारत सरकारला शक्य होईल ती मदत करण्यास सदैव तत्पर आणि तयार आहेत, असे आवाहन माजी सैनिकांचे लीडर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माजी सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष तथा महाराणी येसुबाई म्हणजेच स्वराज्यनिष्ठ गणोजीराजे पिलाजीराजे शिर्के यांचे वंशज, माजी सैनिक अधिकारी, शंभुसेना प्रमुख श्रीमंत दिपकराजे शिर्के यांनी केले. भारत सरकारने व राज्य सरकारने माजी सैनिकांना देशसेवा करण्याची पुन्हा संधी द्यावी, अशा मागणी पुणे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केंद्र सरकारला देत सन्माननीय राष्ट्रपती महोदय, पंतप्रधान,



रक्षामंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देण्यात आले. यावेळी माजी सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष दिपकराजे शिर्के, प्रदेश उपाध्यक्ष श्रीमंत राठोड, प्रदेश सरचिटणीस अमित मोहिते पाटील, प्रदेश संपर्क प्रमुख चंद्रकात गायकवाड, शंभुसेना संघटनेचे मुख्य प्रवक्ते स्वराज्यनिष्ठ गणोजीराजे वंशज लक्ष्मीकांत राजे शिर्के, समन्वयक ॲड. माजी सैनिक राजेंद्र कदम, कॅप्टन बाबू पोळके साहेब, सुभेदार मेजर भूवालसिंग, सुभेदार संभाजी लांडगे, खेड तालुकाध्यक्ष दत्तात्रय सुक्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# काव्यप्रेमी जीवनगौरव पुरस्कार विजय फडणीस यांना जाहीर

## काव्यप्रेमी शिक्षक मंचचे साहित्य व प्रेरणा पुरस्कार जाहीर

## ११ मे रोजी चिपळूणला वितरण

**सोलापूर । गुरुदत्त वाकदेकर**

येथील काव्यप्रेमी शिक्षक मंच या राज्यस्तरीय साहित्यिक संस्थेच्या वतीने दरवर्षी मराठी साहित्य क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट रचनांना काव्यप्रेमी साहित्य पुरस्कार तर काव्यप्रेमी परिवारातील सर्वोत्कृष्ट योगदानाकरिता काव्यप्रेमी प्रेरणा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यंदाचे साहित्य व प्रेरणा पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले असून पुरस्कार वितरण सोहळा चिपळूण (रत्नागिरी) येथील लोकमान्य टिळक स्मारक मंदिराच्या बाळशास्त्री जांभेकर सभागृहात ११ मे रोजी सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे.

काव्यप्रेमी साहित्य पुरस्काराचे मानकरी बु. कोकीळा शेजवळ स्मृती सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार - डॉ. दाक्षायणी पंडित, पुणे, स्व. जयवंती तावडे स्मृती सर्वोत्कृष्ट कादंबरी पुरस्कार - नीला नातू, रत्नागिरी, स्व. यशवंत चिंधू नेरे स्मृती सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार - सीमा झुंजारराव, मुलुंड, स्व. भिमाई बाविस्कर स्मृती सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार- अविनाश चिंचवडकर, बेंगलुरू कर्नाटक, ॲड. कॉ. मदन फडणीस स्मृती सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार- किरण वेताळ, पुणे, स्व. रूक्मिणीबाई नारायण चवडेकर स्मृती सर्वोत्कृष्ट गझलसंग्रह पुरस्कार- डॉ. स्नेहल कुलकर्णी, गारगोटी, दिलीप गोविंद दमाणे स्मृती सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार- नयना निगळ्ये, न्युयॉर्क, अमेरिका, सौ. सुंदर बोंगाळे स्मृती सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार- सई बने, डोंबिवली, कै. मातोश्री रत्नाबाई घोडके सर्वोत्कृष्ट ललित साहित्य पुरस्कार- आनंद सांडू, चेंबूर, स्व. विष्णूपंत माळोकार स्मृती वैचारिक साहित्य पुरस्कार- डॉ. दिनेश वाघुंबरे, सांगली, शंकर घोरसे सर्वोत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार- विजय जोशी, डोंबिवली व रश्मी गुजराथी, पुणे यांना विभागून. काव्यप्रेमी प्रेरणा पुरस्कार स्व. बळवंत पाटील स्मृती प्रेरणा पुरस्कार- मुकेश विशे, ठाणे, कै. श्रीमती उमा शंकरराव कुलकर्णी स्मृती प्रेरणा पुरस्कार- कविता दाते, वर्धा, स्व. सौ. मंगला मदन फडणीस स्मृती प्रेरणा पुरस्कार- गजानन पाटील, सांगली, कै. चंद्रकांत शिवराम दिनकर स्मृती प्रेरणा पुरस्कार- प्रमोद भागवत, अमरावती, कै. मीराबाई प्रल्हादराव भांदर्गे स्मृती प्रेरणा पुरस्कार- श्रीमंत कोळी, सोलापूर, कै. रामा खंडू देवकते मार्डीकर स्मृती प्रेरणा पुरस्कार- सिराज शिकलगार, सांगली, कै. सौ. संजिवनी यशवंत मराठे स्मृती प्रेरणा पुरस्कार- अश्विनी धाट, धाराशिव, कै. मातोश्री सौ. वेणू महादेव आत्राम स्मृती प्रेरणा पुरस्कार- गणेश खडके, अमरावती,




कै. लक्ष्मण राजाराम राजेगांवकर स्मृती प्रेरणा पुरस्कार- सौरभ नवले, पुणे आणि यंदाचा काव्यप्रेमी जीवनगौरव पुरस्कार मुंबईतील विजय फडणीस यांना देण्यात येणार आहे.

काव्यप्रेमी साहित्य व प्रेरणा पुरस्कार वितरण या सोहळ्याचे उद्घाटन काव्यप्रेमी शिक्षक मंचचे संस्थापक अध्यक्ष आनंद घोडके यांच्या अध्यक्षतेखाली जेष्ठ साहित्यिक, इतिहास संशोधक, पुराणवस्तू अभ्यासक प्रकाश देशपांडे हे करणार आहेत. तर कृषीभूषण, ज्येष्ठ साहित्यिक, म.सा.प.चे उपाध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून को.म.सा.प. रत्नागिरीचे जिल्हाध्यक्ष आनंद शेलार, को.म.सा.प.चे केंद्रीय कार्यवाह माधव अंकलके, मालगुंड येथील कवी केशवसुत स्मारक समितीचे अध्यक्ष गजानन पाटील उपस्थित राहणार तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, चिपळूणचे कार्यवाह सुनिल खेडेकर, लोकमान्य टिळक वाचनालयाचे अध्यक्ष तथा कवी, नाटककार, बोलीभाषा अभ्यासक अरूण इंगवले, काव्यप्रेमी शिक्षक मंचचे संस्थापक सचिव कालिदास चवडेकर यांच्यासह काव्यप्रेमी राज्य समितीचे उपाध्यक्ष राज भिंगारे, कोषाध्यक्ष कृष्णा शिंदे, काव्यप्रेमीचे राज्य सदस्य राष्ट्रपाल सावंत, प्रमोद बाविस्कर, जया नेरे, सत्येंद्र राऊत, नवनाथ खरात व रामदास देशमुख उपस्थित राहणार आहेत. याशिवाय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, चिपळूणच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या वतीने नरवीर तानाजी मालुसरे यांचे १२ वे वंशज डॉ. शितल मालुसरे, पुण्याचे ज्येष्ठ गझलकार बबन धुमाळ, आटपाडी वाचन उपक्रमाचे कार्यवाह दिनेश देशमुख, नागपूरचे कवी शंकर घोरसे, कराडचे चंद्रकांत कोळी यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय कवी संमेलनाचे तीन सत्र संपन्न होणार आहेत. संमेलनासाठी राज्यभरातून शिवाय बेंगळुरू, न्यूयॉर्क येथून काही कवी उपस्थित राहणार असल्याची माहिती मुख्य संयोजक राष्ट्रपाल सावंत यांनी दिली.

# पत्रकारिता मानवी संवेदनशीलतेने ओथंबलेलीच असावी

गेल्या १२ वर्षात आपली विश्वासार्हता झपाट्याने गमावत असलेल्या भारतीय वृत्तवाहिन्यांनी ऑपरेशन सिंदूर नंतर आपापल्या स्टुडिओमध्ये वॉर रूम तयार केले आहेत. आताच्या परिस्थितीत युद्ध हाच पर्याय असल्याचा आभास निर्माण करण्यासाठी त्यांची चढाओढ लागली आहे. प्रत्येकाला आपल्या टीआरपीची चिंता आहे. टीआरपी वाढला तर कमाईही वाढते! त्यासाठी देशातील सामंजस्य व सौहार्द संपले तरी त्याची त्यांना पर्वा नाही. खरे तर या चॅनल मालकांना आणि त्यांना चावी देणाऱ्या आकांना हे चांगले ठाऊक आहे की, आजच्या काळात प्रत्येक युद्ध मानवी हिताच्या किंमतीवर लढले जाते. त्यासाठी देशाला मोठी किंमत मोजावी लागते. पण त्याची कसलीही फिकीर न करता सोशल मीडियावीर आणि चॅनलवाले यांच्या कव्हरेजमध्ये केवळ युद्धाचा उन्माद दिसतोय. समजूतदारपणा आणि विवेक पूर्णपणे गायब आहे. यातील बहुसंख्य माध्यमकर्मी डिजिटल लढाया पाहात वाढलेले आहेत. खरोखरचे युद्ध कव्हर करणारे कुठेही नाहीत. युद्धाचे राष्ट्रीय /आंतराष्ट्रीय राजकीय अर्थकारणही त्यांना कळत नाही. जगातील प्रत्येक समंजस व्यक्ती, त्याची विचारसरणी काहीही असो. हेच म्हणेल की, आजच्या काळात, देशांमधील परस्पर समस्या आणि वाद सोडवण्यासाठी राजकीय मुत्सद्दीपणा हा एकमेव योग्य पर्याय आहे; युद्ध नाही.

पण आमच्या टीव्हीपुरममध्ये युद्धाचा उन्माद वाढविण्याची स्पर्धा सुरू असल्याचे दिसते. राजकारण कठोर असू शकते, पत्रकारिता मानवी संवेदनशीलतेने ओथंबलेलीच असावी, हे चिरंतन मूल्ये ते कधी तरी लक्षात घेतील का?



**प्रभाकर ढगे**
**समुह संपादक**
**गोवा**

**प्रासंगिक**

# ८ ऑगस्ट २०१५ संचमान्यता शासननिर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणे मान्यता द्यावी- पंडित

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्यावतीने मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांना मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

२८ ऑगस्ट २०१५ चा संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणे संच मान्यता देण्यात यावी. या व इतर अनेक मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्यावतीने चौंडी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, शिक्षणमंत्री दादा भुसे साहेब यांना देण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष सुनिल पंडित यांनी दिली. या निवेदन म्हटले की, १५ मार्च २०२४ या शासन निर्णयाच्या अटींमुळे ग्रामीण भागातील बहुतांश छोट्या शाळांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.शासन निर्णय २८ ऑगस्ट २०१५ मध्ये दुरुस्ती करून शासन निर्णय ८ जानेवारी २०१६ नुसार इयत्ता नववी -दहावी या वर्गासाठी किमान ३ पदे मंजूर होती. त्यामुळे ग्रामीण भागातील छोट्या शाळांमध्ये किमान तीन शिक्षक उपलब्ध होत होते. परंतु शासन निर्णय १५ मार्च २०२४ मधील मुद्दा क्रमांक ३ मधील निकषानुसार इयत्ता नववी मध्ये २० विद्यार्थी तसेच इयत्ता दहावी मध्ये २० विद्यार्थी असणे आवश्यक आहेत तरच शिक्षक पद मंजूर होणार आहे. अन्यथा इयत्ता नववी- दहावी गटासाठी कोणतेही शिक्षक पद मंजूर होणार नाही. बहुतांश ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता नववी भाग दहावी मध्ये विद्यार्थी संख्या ४० पेक्षा कमी आहे. अशा सर्व शाळामध्ये एकही पद मंजूर न झाल्याने संस्थाचालकांवर शाळा बंद करण्याची वेळ आलेली आहे.तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर माध्यमिक शिक्षणाचा बिकट प्रश्न निर्माण होणार आहे. उदा १ काही ग्रामीण भागात ४०/४२ विद्यार्थी आहेत परंतु इयत्ता ९ वी मध्ये १८ विद्यार्थी व इयत्ता १० मध्ये २३ विद्यार्थी म्हणजेच एकूण ४० पेक्षा पट असूनही शाळेला G$T-(९ -१०) गटासाठी एकही शिक्षक मंजूर नाही. म्हणजे अशी शाळा आपोआपच बंद होणार. G$T>-(९ -१०) किमान विज्ञान/ गणित , समाजशास्त्र , भाषा /इंग्रजी असे किमान तीन शिक्षक नसतील ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील. उदा २ काही गावातील शाळेमध्ये २० ते ३० विद्यार्थी आहेत जर ती शाळा नव्या निकषानुसार बंद होत असेल तर त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय काय ? ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पुरती डबघाईला आली आहे ? पालकांना याचा आर्थिक फटका बसेलच . शिवाय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक



वेळ वाया जाईलच . शिवाय विद्यार्थ्यांना शारीरिक त्रास होणार तो वेगळाच? सुरक्षेचा प्रश्न अनुत्तरीतच राहणार ? उदा ३ गावातील छोट्या शाळातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा शासन निर्णयामध्ये कोणतीच तरतूद दिसून येत नाही कारण या छोट्या शाळातील विद्यार्थ्याच्या साठी कला ,क्रीडा या साठी शिक्षक नकोत का ? याचे उत्तर शासनाकडे नाही हीच चिंतेची बाब आहे . उदा ३ मोठ्या शाळांमध्ये कला /क्रीडा शिक्षक मंजूर केले. परतू सदर शिक्षक पदे स्वतंत्रपणे मंजूर नसून.एकूण मंजूर पदांमधून फक्त स्वतंत्र दाखवली आहे. म्हणजेच कला /क्रीडा / कार्यानुभव यासाठी शिक्षक पदे मंजूर केल्याचा आभास निर्माण केला. छोट्या शाळा बंद झाल्याने हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार आहे त्या अतिरिक्त शिक्षकांचा समायोजनाचा प्रश्न बिकट होणार आहे . याचा परिणाम पवित्र प्रणालीतील शिक्षक भरतीवर होणार आहे. जवळपास शिक्षक भरती रद्द करावी लागणार अशी चिन्हे आहेत. शासन निर्णयातील जाचक व ग्रामीण भागाचा अभ्यास न केल्याने तसेच वरिष्ठ कार्यालयातील उच्चपदस्थ अधिकारी यांच्या अभ्याशून्यते मुळे या शासन निर्णयांमध्ये शासनाची नामुष्की येईल अशा प्रकारचे नियम घातले गेले किंबहुना तशा निर्णय समिती तसेच मंत्रिमंडळ यांच्यासमोर ठेवली गेल्यामुळे त्याचा शिक्षण क्षेत्राला त्रास होत आहे. शासनाने याचा सखोल ग्रामीण व शहरी भाग असा स्वतंत्र विचार करून विद्यार्थ्या शिक्षणाच्या दृष्टीने व भविष्यकाळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कायद्यामध्ये लवचिकता आणून सुधारित निकषांचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. छोट्या शाळांमध्ये कोणतेही विशेष शिक्षक नाहीत याचा अर्थ ग्रामीण भागातील शाळांनी परिपूर्ण शिक्षण घेऊ नये का असा प्रश्न जनतेमध्ये निर्माण होत आहे. तसेच शासनाच्या या धोरणामुळे खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना एक प्रकारे प्रोत्साहन देण्याचा शासनाचा मानस आहे की काय याबद्दल तीव्र भावना सर्व समाजातून गोरगरीब जनतेतून व्यक्त केली जात आहे. भारतीय राज्यघटनेने सर्वांना शिक्षणाचा समान अधिकार दिला असून याबाबत शासनाचे दायित्व नमूद केले असतानाही जाचक शासन निर्णय द्वारे ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था संपवण्याचा प्रयत्न या शासन निर्णयामुळे होत आहे., असे निवेदनात नमुद करण्यात आले. तरी शासनाने लवकरात लकवर शिक्षकांचे मागण्या मान्य करावेत, अन्यथा राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, अशा इशारा देण्यात आला.

# कादंबरी महाजन : बहुमुखी गुणवत्तेची झळाळती कामगिरी

**नवी मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**



पाचोरा (जि. जळगाव) येथील कादंबरी संदीप महाजन हिने एम.जी.एम. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, कामोठे (नवी मुंबई) येथून फिजिओथेरपी पदवी (बीपीटी) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कुटुंबाचा आणि गावाचा अभिमान वाढवला आहे. कादंबरीने केवळ अध्ययनातच नव्हे, तर महाविद्यालयीन जीवनात सांस्कृतिक आणि क्रीडाक्षेत्रातही आपली चमक दाखवली.

अभ्यासाच्या जोडीने आपल्या अंगभूत कलागुणांना योग्य वाव देत, तिने विविध कार्यक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेतला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सांस्कृतिक विभाग प्रमुख या मानाच्या पदासाठी झालेल्या निवडणुकीत मिळवलेला निर्विवाद विजय. या माध्यमातून तिने नेतृत्वगुणही सिद्ध केले. दि. ७ मे २०२५ रोजी जाहीर झालेल्या अंतिम वर्षाच्या निकालात कादंबरीने प्रत्येक विषयात मिळवलेली 'उत्कृष्ट' (ए+) श्रेणी तिच्या सातत्यपूर्ण मेहनतीचा आणि चिकाटीचा स्पष्ट पुरावा आहे. तिच्या या यशाने केवळ आई-वडिलांचे नव्हे तर शिक्षकांचे, आणि संपूर्ण कुटुंबाचे हृदय आनंदाने भरून आले आहे.

कादंबरीचं हे बहुआयामी यश पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही. तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी संपूर्ण महाजन कुटुंबाकडून हार्दिक शुभेच्छा आणि आशीर्वाद.

# वैष्णवी मेहेत्रे व आर्यन बोरा शाळेच्या गुणवत्ता यादीत प्रथम

## सायन्स व कॉमर्सचा शंभर टक्के निकाल

**अहमनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये झालेल्या बारावी बोर्डाच्या (एचएससी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा सायन्स व कॉमर्स दोन्ही विभागांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. या दोन्ही विभागात पहिल्या पाच क्रमांकाने शाळेच्या गुणवत्ता यादीत चमकलेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभासाठी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, सल्लागार समितीचे सदस्य भूषण भंडारी, विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, उपमुख्याध्यापक पोपट पवार, पर्यवेक्षक बाळू वाव्हळ, विष्णु गिरी, कैलास साबळे आदींसह गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.



वैष्णवी प्रशांत मेहेत्रे हिने ९१.५० टक्के गुण मिळवून सायन्स विभागात विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर आर्यन कैलास बोरा याने ९५.६७ टक्के गुण मिळवून कॉमर्स विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

संस्थेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाहक गौरव फिरोदिया यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. एचएससी शास्त्र विभाग प्रथम- वैष्णवी प्रशांत मेहेत्रे हिने ९१.५० टक्के गुण (इंग्रजीत ९१ गुण), द्वितीय- यशस्वी रवी साखला ८८.८३ टक्के (डीजी व जीएस विषयात २०० पैकी १९९ गुण), तृतीय- भूषण तखतमल गुगळे ८३.३३ (मराठीत ९३ गुण), चौथी- प्राजक्ता विलास शिंदे ८०.८३ टक्के (भौतिक शास्त्र ८३ व रसायनशास्त्र ९२ गुण), पाचवी- वैभवी नितीन रसाळ ७९.५० टक्के (समाजशास्त्र ९१ गुण). एचएससी कॉमर्स विभाग प्रथम:- आर्यन कैलास बोरा याने ९५.६७ टक्के (अकौटन्सी, मॅथ्स व आयटीत १०० पैकी १०० गुण), द्वितीय- आकांक्षा सचिन कटारिया ९३.८३ टक्के (इंग्रजीत ९२ गुण), तृतीय- श्लोक सचिन बोरा ९३.३३ टक्के, चौथा- प्रेम आनंद कोठारी ९२.८३ टक्के, दिया जतिन मेहेता ९१.६७ टक्के (अर्थशास्त्र ९७ गुण) पार्थ मंगेश चंगेडिया, स्मित संतोष गुगळे या विद्यार्थ्यांनी बुक कीपिंग ॲण्ड अकाउंटन्सी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

# सायबर सुरक्षेसाठी शासनाचा पुढाकार

**मुंबई । प्रतिनिधी**

सायबर सुरक्षेसाठी देशातील अत्याधुनिक सुविधा महाराष्ट्रात आहेत. या माध्यमातून सायबर गुन्हे, सायबर फसवणूक व मानवी तस्करीपासून लोकांना वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या पुढील काळातही अधिक परिणामकारपणे काम करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सायबर फसवणुकीसंबंधीच्या कॉल्सना उत्तरे देणे व नागरिकांना माहिती मिळण्यासाठी चॅटबॉट व माहितीपट महत्त्वाचे ठरणार आहेत. नोकरीच्या निमित्ताने परदेशात नेऊन विक्री करण्यासारख्या घटना रोखण्यासाठीही महाराष्ट्र सायबरने जनजागृती उपक्रम हाती घ्यावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केल्या. महाराष्ट्र सायबरच्या आर्टिफिशियल इंटिलिजन्स बॉट व सायबर जागरुकता माहितीपट या नाविन्यपूर्ण नागरिक केंद्रीत उपक्रमांचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे केले.



# इनामदार इंग्लिश मीडियम स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेजचा बारावी निकाल ९८ टक्के

**अहमदनगर । आबीद खान**

इकरा एज्युकेशन अँण्ड वेल्फेअर सोसायटीच्या गोविंदपूरा येथील पी. ए. इनामदार इंग्लिश मीडियम स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेजने बारावीच्या बोर्ड परीक्षेत यंदाही यशाची परंपरा कायम राखली आहे.

मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत संस्थेचा एकूण निकाल ९८ टक्के लागला. या परीक्षेत मिर्झा मदीहा तनवीर हिने ७५.८५% गुण मिळवून कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक पटकावला.

शेख जेबा नासिर हिने ६९.३३% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर मिर्झा जफिरा अतीक हिने ६५% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

या घवघवत्या यशाबद्दल कॉलेजचे प्राचार्य फिरोसअली मराक्टील, उपप्राचार्या फरहाना शेख, तसेच संस्थेचे चेअरमन अब्दुल रहीम खोकर, उपाध्यक्ष इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालीद शेख यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले.

# मराठा पतसंस्थेचे ५० कोटींचे उद्दीष्ट पूर्ण
## चालू आर्थिक वर्षात २० लाखांचा नफा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ प्रणित, अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेचे मार्च अखेर ५० कोटी ठेवीची उद्दिष्ट पुर्ण झाले असुन सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात २० लाख ढोबळ नफा झाला असल्याची माहिती पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष चेअरमन डॉ. इंजि. विजयकुमार ठुबे यांनी दिली.

मार्च अखेर पतसंस्थेचा एकत्रीत व्यवसाय ८५ कोटी ३९ लाख, खेळते भागभांडवल ५६ कोटी ०३ लाख, स्वनिधी १ कोटी ९० लाख, एकुण ठेवी ५२ कोटी, कर्ज वितरण ३४ कोटी ३९ लाख असुन १९ कोटी १५ लाखाची सुरक्षित गुंतवणुक केलेली आहे. संस्था समाजातील होतकरू उद्योजकांना अर्थपुरवठा करून स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मदत करत आहे.

संस्थेने आतापर्यंत अनेक उद्योजकांना मोठ्या प्रमाणात अर्थसाह्य केलेले असुन समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करत आहे. यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन बाळकृष्ण काळे म्हणाले की, पतसंस्थेने रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेले असुन त्यानिमित्ताने रौप्यमहोत्सवी ठेव योजना चालु केली आहे. सदरच्या ठेव योजनेमध्ये २५१ दिवसाला १० टक्के व्याज व पाच ग्रॅम चांदीचे नाणे देण्यात येणार आहे. तसेच रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्ताने सभासदांनी ५० हजार शेअर्स मध्ये गुंतवणुक केल्यास १५ टक्के लाभांश व ५ ग्रॅम चांदीचे नाणे देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

संस्थेच्या मार्केट यार्ड, भिंगार, संगमनेर, पाथर्डी, नेवासा, शेवगाव, कर्जत या ठिकाणी शाखा कार्यरत आहेत. संस्थेच्या विविध योजनेचा लाभ घेण्याचे अवाहन संचालक लक्ष्मण सोनाळे, ज्ञानदेव पांडुळे, किशोर मरकड, राजश्री शितोळे, सतिश इंगळे, प्रा. किसन पायमोडे, यशवंत शिंदे, ॲड काशिनाथ डोंगरे, ज्ञानेश्वर अनभुले, इंजि. संभाजी मते, व्दारकाधिश राजेभोसले, इंजि. बाळासाहेब सोनाळे, प्रा. डॉ. कल्पना ठुबे, ॲड राजेश कावरे, निवृत्ती रोहोकले, सुनिल जाधव मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड यांनी केले आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.




मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# बाजार समिती सभापतीपदी मडके तर उपसभापतीपदी लांडे यांची निवड

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत दोन वर्षापूर्वी माजी आमदार चंद्रशेखर घुले, नरेंद्र घुले, पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. क्षितीज घुले यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी प्रणीत ज्ञानेश्वर शेतकरी विकास मंडळाने सर्वच्या सर्व १८ जागा मोठ्या मताधिक्क्याने जिंकून दणदणीत विजय मिळविल्यानंतर शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती एकनाथ कसाळ व उपसभापती गणेश खंबरे यांची दोन वर्षापूर्वी बिनविरोध निवड करण्यात आली होती.

सभापती एकनाथ कसाळ व उपसभापती गणेश खंबरे यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे, लोकनेते मारूतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष मा. आमदार नरेंद्र घुले, मा. आमदार चंद्रशेखर घुले आणि सभापती क्षितिज घुले यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी नाना मडके आणि उपसभापतीपदी रागिणीताई सुधाकर लांडे यांची निवड बिनविरोध निवड करण्यात आली. शेवगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चेअरमन पदी मडके आणि व्हाईस चेअरमनपदी रागिणी लांडे यांची निवड झाल्याबद्दल ज्येष्ठ संचालक काकासाहेब नरवडे आणि मा. सभापती अरुण लांडे व जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी कैलास नेमाने, ताहेर पटेल,एकनाथ कासाळ,गणेश खंबरे,सुधाकर लांडे, अनिल मडके, अशोक मेरड, हनुमान पातकळ,राजेंद्र दौंड,भास्कर खेडकर ,जमीर पटेल,जाकिर कुरेशी, बाळासाहेब वडघणे,अशोक धस, राहुल बेडके, प्रदीप काळेमनोज तिवारी,रामजी अंधारे, विलासराव लोखंडे,अरुणराव घाडगे,भारत मोटकर, चंद्रकला कातकडे,प्रिती अंधारे, समिर शेख, नवनाथ ईसारवाडे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# आत्मा मालिकच्या बालनाट्यास उत्कृष्ट नाट्यनिर्मिती पुरस्कार



**कोपरगाव । किसन पवार**

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव २०२५ चा पुरस्कार वितरण सोहळा नुकताच नाशिक येथे पार पडला. आत्मा मालिक माध्यमिक व उच्च माध्यमिक गुरुकुल कोकमठाण शाळेला ''विसर्जन'' या बालनाट्यासाठी तर गुरुदेव चैतन्य स्वरूप गुरुकुल नेर्ले ता. वाळवा जि. सांगली या शाळेला ''डोक्यात गेलयं!'' या बालनाटयांसाठी 'उत्कृष्ट नाट्य निर्मिती पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे वैष्णव निमसे बालनाट्य 'विसर्जन' (कोकमठाण शाखा), रोहन वाघिरे व अभिनया खाडे बालनाट्य ''डोक्यात गेलयं!'' (नेर्ले शाखा), श्रद्धा शिंदे बालनाट्य 'मला उत्तर हवय' (पुरणगाव शाखा), प्राची वाघ बालनाट्य 'मॅडम' (पुरणगाव शाखा), रिदीमा सातवे ''बालनाट्य फुलराणी'' (शहापूर शाखा) या सहा विद्यार्थ्यांना अभिनय गुणवत्ता प्रथम श्रेणी पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्याचा आश्रमाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी आश्रमाचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी म्हटले की, शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आत्मा मालिक शैक्षणिक संकुलात स्वतंत्र कला, क्रीडा, संगीत, नृत्य व अभिनय यांचे प्रशिक्षण तज्ज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे या सर्वच क्षेत्रात आत्मा मालिकचे विद्यार्थी यशस्वी भरारी घेत आहे. यावेळी त्यांनी यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना कला विभागाचे सहाय्यक व्यवस्थापक आत्मदर्शन बागडे, दिग्दर्शक दिलीप सपकाळ, रॉबिन लोपीस, सहाय्यक दिग्दर्शक वसंत नारद यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प. पू. आत्मा मालिक माऊली, आश्रमाचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठल होन, विश्वस्त उमेश जाधव, विष्णु पवार, प्रदीप भंडारी, प्रकाश गिरमे, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, मीरा पटेल, सर्व प्राचार्य, विभाग प्रमुख, आदींनी अभिनंदन केले.

# प्राईड अकॅडेमी ज्युनिअर कॉलेज निकाल ९७.४ टक्के







**श्रीरामपूर । शफीक बागवान**

माऊली प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट संचलित प्राईड अकॅडेमी इंग्लिश मेडीअम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, भेर्डापूर-वांगी महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा इयत्ता १२ वी चा निकाल ९७.४ टक्के लागला आहे. महाविद्यालयातून १२ वी सुटणाऱ्या विद्यार्थ्यांची ही पाचवी बॅच होती. महाविद्यालयात विज्ञान शाखेमध्ये ८३.८३ टक्के गुण मिळवून मगर दर्शन सचिन याने प्रथम क्रमांक पटकावला असून त्यापाठोपाठ अनुक्रमे ८३.६७ आणि ७५.८३ टक्के गुण मिळवून पठाण आयान ताजखा आणि कांबळे अमित रविंद्र यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविले. माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक माऊली मुरकुटे व प्राईड अकॅडेमीच्या संस्थापिका तथा पंचायत समिती सभापती वंदनाताई मुरकुटे यांच्यासह महाविद्यालय व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक समिती, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थ यांनी विद्यार्थांच्या प्रगतीचे कौतुक केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# हरित हंगाम पूर्वनियोजन व आढावा बैठक संपन्न



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

ता. ८ रोजी महाराष्ट्र शासन कृषी विभागाने हरित हंगामाच्या पूर्वनियोजन व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत राज्यातील कृषी उत्पादन, पिकांची विविधता, आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजनांवर शेवगाव पाथर्डीच्या आमदार मोनिकाताई राजळे यांनी चर्चा केली.

या वेळी आगामी हंगामात लागवडीसाठी आवश्यक बियाणे, खतांचा पुरवठा, तसेच संभाव्य नैसर्गिक आपत्तींचे व्यवस्थापन या संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. हवामानातील बदल लक्षात घेता, आपत्कालीन परिस्थितींसाठी पूर्वतयारीची रणनीती देखील मांडण्यात आली. कृषी विभागाचे अधिकारी व शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी एकत्र येऊन, आगामी हंगामासाठी पिकांच्या लागवडीसाठी योग्य नियोजनावर चर्चा केली तसेच राज्य सरकारने कृषी क्षेत्राला मजबूत बनवण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली असून, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विशेष लक्ष दिले आहे. या बैठकीत घेतलेल्या निर्णयांमुळे हरित हंगामाच्या अंमलबजावणीसाठी एक नवी दिशा मिळेल, अशी आशा आहे. यावेळेस बापूसाहेब भोसले, संजय टाकळकर, बापूसाहेब सागडे, कृषी अधिकारी अंकुश टकले, संदीप खरड, कचरू चोथे, सुरेश नेमाने यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





# सर्वोच्च न्यायालय निकालानंतर भावी नगरसेवकांचा वाढला उत्साह

**राहुरी । दत्ता जोगदंड**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात आज (८ मे २०२५) महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे स्पष्ट आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले. तसेच चार आठवड्यांच्या आत निवडणुकीची अधिसूचना काढण्याचाही निर्देश दिला आहे. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. परंतु, आता २०२२ पूर्वीप्रमाणेच ओबीसी आरक्षण कायम ठेवत न्यायालयाने निवडणुकांना मंजुरी दिली आहे. राज्य सरकारनेही या निर्णयाला कोणताही आक्षेप नोंदवलेला नसल्याने आता चार महिन्यांत निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की, ''स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अडवण्याचे आता कोणतेही कारण उरलेले नाही.'' ओबीसींच्या जागा कमी झाल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा होता, त्यावर न्यायालयाने ''२०२२ पूर्वीची स्थिती तशीच राहील'' असे आदेश दिले आहेत. राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळेत कार्यवाही करावी, असेही न्यायालयाने निर्देशित केले. कोरोना काळापासून रखडलेल्या मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आदी महापालिकांच्या निवडणुकांसह राज्यातील सर्व महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व नगर पंचायत निवडणुकांना आता हिरवा कंदील मिळाला आहे. त्यामुळे सप्टेंबर २०२५ पर्यंत या सर्व निवडणुका घेणे राज्य निवडणूक आयोगासाठी बंधनकारक ठरणार आहे. या निर्णयामुळे राहुरीसह राज्यभरात नगरसेवक इच्छुकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, निवडणुकीच्या हालचालींना गती मिळण्याची शक्यता आहे.

# मुख्याधिकारी घोलप यांच्याविषयी श्रीरामपूरात असंतोष; न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन, अतिक्रमण जागेत ठोकले पत्रे

**श्रीरामपूर । शफीक बागवान**





गेल्या चार महिन्यापूर्वी श्रीरामपूर नगरपालिकेने पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण मोहीम मोठ्या धुमधडाक्यात सुरू केली त्याचा गाजावाजा अहिल्यानगर जिल्ह्यात झाला, नंतर आठ दहा दिवसानंतर अतिक्रमण मोहीम थंड झाली, ती आजपर्यंत थंडच आहे. अतिक्रमण काढताना लहान व्यवसायीकावर अन्याय झाला. काही अतिक्रमणे आहे तशीच आहे. गुरुनानक मार्केटची अतिक्रमणे आजही तशीच आहे. रामनवमी उत्सवानंतर जे अतिक्रमणे हटवण्यात आली होती त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमणे होऊ लागली. दरम्यानच्या काळामध्ये जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे यांनी प्रवरा कालवा व चाऱ्यावर झालेली अतिक्रमणे हटवण्याची आदेश दिले परंतु त्या आदेशालाही जलसंपदा विभागाकडून केराची टोपली दाखवण्यात आली. मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी आवेशपूर्ण होत अतिक्रमण संदर्भात मुलाखती दिल्या. मात्र नव्याचे नऊ दिवस अशाप्रकारे हे अतिक्रमणे काही ठिकाणी पुन्हा तशीच उभी राहिली तर काही ठिकाणी काढूनही त्याचा काही उपयोग झाला नाही. याच काळात विस्थापित व्यावसायिकाना बरोबर घेऊन काहींनी उपोषणे केली. राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी याला पाठिंबा दिला. मंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत आश्वासन दिले. त्यानंतर नगरपालिकेच्या अतिक्रमण मोहिमेला अडसर निर्माण झाला. काही दिवसांनी सय्यदबाबा उरुस व रामनवमी उत्सव सुरू झाला याच काळात पुन्हा अतिक्रमणे वाढली. मंत्री विखे यांनी प्रवरा कालवा चाऱ्या अतिक्रमण मुक्त करण्याचे आदेश जलसंपदा विभागाला दिले. जलसंपदा विभागाने तातडीने अतिक्रमणधारकांना नोटीस पाठवल्या परंतु आजपर्यंत कालवा व चारी अतिक्रमण मुक्त झाली नाही. श्रीरामपुरात अनेक चाऱ्यावर हॉटेल, घरांची पक्की बांधकामे तर पाटबंधारे खात्याच्या कालव्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर निवासी वसाहती उभी आहे, या निवासी वसाहतीच्या ड्रेनेज पाईपलाईन थेट कलव्यामध्ये सोडण्यात आल्या. हेच पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी वापरले जाते. कालवा व चाऱ्या अतिक्रमण मुक्त करण्याचे आदेश विखे यांचे आदेश असताना जलसंपदा विभागाकडून त्यास केराची टोपली दाखविण्यात आली. अतिक्रमण मोहीम चालू असताना मेनरोडवरील अतिक्रमण निघणार का? हा प्रश्न अनेक नागरिक उपस्थित करत होते परंतु हा विषय न्यायालयात सुरू होता न्यायालयाचा निकाल अतिक्रमणधारकांच्या विरोधात गेला. अतिक्रमण धारकांनी दुकाने काढण्यासाठी तीन महिन्याची (३ मे पर्यंत) मुदत घेतली. नगरपालिकेने या ठिकाणी कारवाई करत अतिक्रमण काढले पण दोन दिवसानंतर पुन्हा याच ठिकाणी रस्त्यावर पत्र्याचे कंपाऊंड उभे झाले, याबाबत जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया, प्रशासक तथा प्रांताधिकारी किरण पाटील सावंत व मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्याकडे नागरिकांनी तक्रारी केल्या असता त्यांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांनी मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांची भेट घेवून अतिक्रमणाबाबतची माहिती घेतली. अतिक्रमण काढलेल्या ठिकाणी आजही व्यवसायिक संभ्रमावस्था आहे. दुकानदाराची हद्द पालिकेने निश्चित केली पाहिजे, पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील रस्ते दुरुस्त झाले पाहिजे त्याचप्रमाणे विजेचे पोल योग्य ठिकाणी स्थलांतरित करा, पिण्याची पाईपलाईनचें काम पूर्ण झाले पाहिजे, असे सांगितले. दरम्यान मेनरोडवर येथील बहुचर्चित अतिक्रमण काढल्यानंतर त्या ठिकाणी व रस्त्यावर लावलेल्या पत्र्याच्या कंपाऊंडबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आदेश दिल्यानंतरही नगरपालिका प्रशासनाने कुठलीही कारवाई केलेली दिसली नाही.





# एसएसजीएम महाविद्यालयाची उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम

**कोपरगाव । किसन पवार**

इ. १२ बोर्ड परीक्षेचा निकाल ता. ०५ मे, २०२५ रोजी जाहीर करण्यात आला असून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा एसएसजीएम महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा ९८.०६, वाणिज्य शाखेचा ६९.७१, कला शाखेचा ५०.६६ व किमान कौशल्य शाखेचा ४१.६७ निकाल लागला असून गुणानुक्रमे विज्ञान शाखेत खरात कुणाल अनिल ८२.५० (प्रथम), केकाण नरेश बाळासाहेब ८१.६७ (द्वितीय), तुवर सार्थक आप्पासाहेब ८१.०० (तृतीय), वाणिज्य शाखेत वायंदेशकर नेहा सुनिल ८७.५० (प्रथम), गायकवाड नितीन राजू ८७.०० (द्वितीय), भसाळे श्रावणी उमेश ८२.५० (तृतीय), कला शाखेत पाचुंदकर निलम दिलीप ८०.८३ (प्रथम), अहिरे प्रतिक्षा रायभान ६८.३३ (द्वितीय), मोरे ओमकार भाऊसाहेब ६७.६७ (तृतीय), तसेच किमान कौशल्य शाखेत वाघ गौरव कचेश्वर ५३.६७ (प्रथम), सानप ओम शरद ५२.६७ (द्वितीय), बोऱ्हाडे शुभम सुनिल ५०.१७ (तृतीय) आलेले विद्यार्थी असून आमदार आशुतोष काळे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ॲड भगिरथ शिंदे, सदस्य विवेक कोल्हे, चैताली काळे, ॲड संदीप वर्पे, सुनिल गंगुले, महेंद्र काले, बाळासाहेब आव्हाड, प्राचार्य डॉ. माधव सरोदे, ज्युनिअरचे उपप्राचार्य संजय शिंदे, कार्यालय अधिक्षक सुनिल गोसावी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# पत्रकार माधव बनसुडे यांना मातृ:शोक

**श्रीगोंदा । गौरव लष्करे**



सौ. चांगुणाबाई (भागुबाई) शिवराम बनसुडे यांचे बुधवार ता. ७ मे २०२५ रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी दुपारी १ वाजता श्रीगोंदा-बाबुर्डी रोड येथे शोकाकुल वातावरणात पार पडला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा वृत्तपत्र विक्रेते माधव शिवराम बनसुडे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन सुना,मुलगी नातवंडे असा परिवार आहे त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार ता. १६ मे २०२५ रोजी सकाळी ७ वाजता सिद्धेश्वर (घाट) मंदिर श्रीगोंदा येथे होणार आहे.

# बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे : कर्मवीर

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, (१ मुलींसाठी) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# शिवाबाबा वाघ प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय साहित्य कलाकृती पुरस्कार जाहीर









**नाशिक । सलीमखान पठाण**

जिल्ह्यातल्या येवला तालुक्यातील पिंपळगाव जलाल येथील शिवाबाबा वाघ प्रतिष्ठान आयोजित शहादू शिवाजी वाघ स्मृती चौथ्या राज्यस्तरीय साहित्य कलाकृती पुरस्काराचे निकाल ता. ०१ मे २०२५ रोजी कामगार दिनाच्या दिवशी जाहीर झाले असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय वाघ यांनी कळविले आहे. शिवाबाबा वाघ प्रतिष्ठान आयोजित शहादू शिवाजी वाघ यांच्या स्मृतीदिनानिमित्त चौथ्या राज्यस्तरीय साहित्य कलाकृती पुरस्काराचे नियोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातून कविता संग्रह- ७८ , कथा संग्रह-२२, कादंबरी -१६ आणि ललित लेखसंग्रह-२२ व इतर ५ अशा एकूण १४३ विविध प्रकारच्या साहित्य कलाकृती पुरस्कारासाठी प्राप्त झाल्या होत्या. या कलाकृतीतून प्रत्येक साहित्य प्रकारातील एक कलाकृतीला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. निकाल पुढीलप्रमाणे -

कवितासंग्रहासाठी वाळवा जि सांगली येथील कवी धनाजी धोंडीराम घोरपडे यांच्या ''जामिनावर सुटलेला काळा घोडा'' कथासंग्रहासाठी वणी, जि यवतमाळ येथील लेखक डॉ अनंता सूर यांच्या ''कोंडमारा, आणि कादंबरीसाठी वैजापूर जि. छ. संभाजीनगर येथील लेखक डॉ. भीमराव वाघचौरे यांच्या ''घरंगळण'' तर हिंगणा रोड, नागपूरच्या लेखिका वर्षा किडे/कुळकर्णी यांच्या ''काळीजफुल'' या ललित लेखसंग्रह कलाकृतीसाठी पुरस्कार जाहीर झाला आहे. सर्व कलाकृती पुरस्कार निवडीसाठी परिक्षक अनुक्रमे कवितासंग्रहासाठी प्रा. रामप्रसाद वाव्हळ- परभणी, कथासंग्रहासाठी प्रा. सुवर्णाताई चव्हाण, येवला, आणि कादंबरीसाठी मा. डॉ. भाऊसाहेब गमे, प्राचार्य, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, तर ललित लेखसंग्रहासाठी मा डॉ धीरज झाल्टे, नाशिक यांनी परीक्षण केले. प्रतिष्ठानने परिक्षकांनी दिलेल्या निर्णयाचे स्वागत करून पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले आहे. पुरस्कार प्राप्त सर्व कलाकृतींचा सन्मान ता. ४ जून २०२५ रोजी पिंपळगाव जलाल ता. येवला येथे होणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य कलाकृती पुरस्कार प्रदान सोहळ्यात होणार असल्याचे अध्यक्ष संजय वाघ यांनी सांगितले.

# राज्य शासनाच्या धोरणात्मक उदासीनतेविरुद्ध इशारा

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे २० मे रोजी 'वॉक-आऊट'

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

महाराष्ट्रातील सरकारी, निमसरकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांकडे राज्य शासन सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती यांनी येत्या २० मे रोजी सकाळच्या सत्रात राज्यभर 'वॉक-आऊट' आंदोलन करण्याची घोषणा केली, हे आंदोलन अखिल भारतीय कामगार-कर्मचारी संघटनेच्या देशव्यापी संपाच्या आवाहनास पाठिंबा दर्शवत करण्यात येणार आहे, अशी २० मे रोजी होणाऱ्या आंदोलनाच्या तयारी संदर्भात अहमदनगर येथे महत्वाची बैठक ता.९ मे रोजी दुपारी ५ वाजता राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना कार्यालय, पाटबंधारे कार्यालय, महानगर पालिकेसमोर आयोजित करण्यात आली. अशी माहिती रावसाहेब निमसे यांना दिली. आंदोलनाविषयी अधिक माहिती देताना विश्वास काटकर यांनी सांगितले, राज्य शासनाच्या धोरणात्मक उदासीनतेविरुद्ध हा इशारा असून, जून महिन्यात शासनाचा संपूर्ण कारभार ठप्प करण्याचा निर्णायक लढा उभारण्यात येणार आहे. राज्यभरातील सरकारी, निमसरकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या २१ प्रमुख मागण्या घेऊन समन्वय समितीने आंदोलनाची हाक दिली आहे.

प्रमुख मागण्या

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची तत्काळ अंमलबजावणी, प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवारांना एकवेळची अनुकंपा नियुक्ती, खुल्लर समितीचा अहवाल प्रसिद्ध करणे, केंद्राप्रमाणे २% महागाई भत्ता वाढ, कंत्राटी/रोजंदारी/अंशकालीन कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण रद्द करणे, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, २००५ पूर्वी आणि नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करणे, १०:२०:३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, नगरपरिषद व नगरपंचायतींचा आकृतीबंध तयार करणे व ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांचे नियमित समावेश, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, आठव्या वेतन आयोगाची स्थापना किंवा राज्य आयोग नेमणे, कायदा रद्द करणे व संचित निधी राज्य सरकारकडे परत करणे, सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांना प्रतिबंधक कायदेशीर संरक्षण कलम ३५३ मध्ये सुधारणा करून देणे, रिक्त पदे भरण्याच्या कार्यवाहीस गती देणे, १९८१ चा शासन निर्णय पुनर्स्थापित करणे, संविधानातील कलम ३१०, ३११ (२) ए, बी, सी रद्द करणे, नवीन क्रिमिनल कायदे रद्द करणे, सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण थांबवणे व सरकारी विभागांचे संकोचीकरण रोखणे, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसंबंधी न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये शासनाने हस्तक्षेप करून सुनावणी लवकर घडवून आणणे आणि चार कामगार संहिता रद्द करणे. या मागण्या मान्य न झाल्यास पुढील काळात शासनाविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. अशी माहिती रावसाहेब निमसे यांना दिली. अधिक माहितीसाठी ९४०५००१८०१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले.

# सौंदर्यभावना सर्वांचेठायी

सौंदर्य-भावना विशिष्टांच्याच ठायी असते; हा अपसमज पसरवून विशिष्टांनी उर्वरित मानव समुहाला अवमानित केलं आहे. सौंदर्यभावना बीज रूपाने सर्वांच्याच ठायी आहे; फक्त त्या बिजाची नीट मशागत व्हायला हवी. नीट मशागत झाली की ते बीज अंकुरतं; त्याचा फुलोरा बहरून येतो. परंतु प्रातिभ बीज स्वतःत असूनही प्रयोगात नसेल तर, तर मग तिथेच विरून जातं. परंतु जे आपल्या या अद्भुत अशा प्रातिभबिजाची निगा राखतात ते त्याकडून सौंदर्यसंवेदना पावतात. प्रतिभा ही दैवी देणगी वगैरे काहीही नाही. ती मानव प्राण्यात जिनोमधून प्रवासत असते. या प्रवासात ती काहींची विस्मृत होते तर काहींची सस्मृत असते हेच पूर्वसंचित म्हणून पूर्वसूरींनी गौरविले आहे. एक लक्षात घ्यावे विस्मृतीला अथक साधना प्राप्त झाली की हरवलेले प्रातिभ सामर्थ्य पुन्हा प्राप्त होऊ शकते. या प्रातिभशक्तीमुळे कुणीही प्रयत्नरत माणूस हवे तसे स्वतःला घडवू शकतो. (उदा. शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, जननेता, कवी-कलावंत आणि संतसुद्धा.) प्रातिभासमृद्ध इसमाला लोक देवाची देणगी प्राप्त भाग्यवंत समजतात. मग उर्वरित लोकांवर देवाचा कोप झालाय असे समजावे काय? हा भ्रम ज्यांनी प्रस्थापित केला त्यांनी अनाकलनाने किंवा हेतूपूर्वक हा प्रमाद केला आहे. देव-दैवापायी माणूस प्रयत्नवंचित राहिलाय हे नाकारता येत नाही. प्रयत्नांती परमेश्वर हा मुद्दा मान्य केला तर परमेश्वर फक्त विशिष्टांचाच आहे हे सूत्र नापास होते; असो ! सौंदर्यशास्त्री बा. सी. मर्ढेकरांनी सौंदर्यभावनेविषयी भाष्य करताना मेंदूला येणाऱ्या तीन प्रकारच्या संगतीचा संदर्भ दिला आहे. त्यांच्यामते मेंदू तीन प्रकारच्या संगती लाऊ शकतो. एक मानसशास्त्रीय, दुसरी तर्कशास्त्रीय आणि तिसरी सौंदर्यात्मक. पुढे ते म्हणतात, ''वाघाचे दृश्य घेऊ या. वाघ बघितल्यावर बघणाऱ्याला सर्कसची आठवण येईल; त्यावरून त्या विदूषकाचे काम करणाऱ्या मनुष्याच्या खासगी जीवनाबद्दल कल्पना सुचतील; त्यावरून मानव म्हणजे जगाच्या रंगभूमीवरचा विदूषक नव्हे का, असा विचार सुचेल. सुप्तासुप्त संज्ञाशक्तीतले हे सर्व प्रवाह दिसायला एखादे वेळेस असंबद्धही दिसतील. पण त्यातही एक प्रकारची संगती असते. ही मानसशास्त्रीय संगती. याच्यानंतर, वाघ हा हिंस्त्र प्राणी आहे आणि त्याने आपणावर झडप घातली तर आपला निकाल लागेल; तेव्हा आपण धूम ठोकली पाहिजे; ही तर्कशास्त्रीय संगती. आणि शेवटी, वाघाचा पिवळा रंग व त्यावरील काळे पट्टे एकमेकांना कसे खुलवतात; त्याच्या पाठीची वक्ररेषा आणि शेपटीची वक्र रेषा यांचे परस्परांना परिपोषक असे वर्तन ही सौंदर्यात्मक संगती.'' या तिन्ही संगती परस्परांच्या नातलग आहेत याबद्दल वाद नाही. मर्ढेकरांनी तर्कशास्त्रीय संगतीत वाघ माणसाचा फडशा पाडतो, तो माणसाची शिकार करतो या आशयाचे तर्क व्यक्त केले आहेत; ते खरे आहेत. पण या तिन्ही संगतींचा विचार करताना आधी जैविक भावनेचा विचार करायला हवा. जैविक भावना सुरक्षित असेल तरच आपण वाघ आणि त्याच्या लिळांचा सौंदर्यात्मक आस्वाद घेऊ शकतो. तो सर्कसमधील वाघ असेल तर जैविकसुरक्षा अधिक वाटते पण तो पिंजऱ्यातून बाहेर पडायची शक्यता जाणवताच सारे प्रेक्षक जिवाच्या भयाने भयग्रस्त होत सर्कस सोडून भराभर बाहेर पडतील, हे सांगणे न लगे. म्हणूनच जैविकभावना प्रधान असून सौंदर्यभावना दुय्यम ठरते. जैविकभावना ही जीवन आहे तर सौंदर्यभावना जीवन अधिक सुंदर करण्याचे सूत्र आहे. मर्ढेकरांचे दुसरे उदा. घेऊ या ''एका खोलीत एक लहान मूल निजले आहे आणि शेजारच्या खोलीत त्याची आई आहे. दूध पिण्याची वेळ होऊन ते मूल जागे होते आणि रडायला सुरूवात करते.'' स्वाभाविकच त्याच्या आईला हे बाळाचे भुकेने व्याकुळलेले रडणे ऐकू येताच ती धावत त्याच्याकडे जाईल, तिला दुधाचा-वात्सल्याचा पान्हा फुटेल. हे मूल गवयाचे असेल तर प्रथम काय होईल या संदर्भात मर्ढेकर म्हणतात, ''ते मूल गवयाचे असल्याने नेहमी कोमल निषादात रडते. तेव्हा त्याने रडायला सुरूवात केल्यावर त्याच्या गळ्यांतून निघणाऱ्या निरनिराळ्या सुरांचे कोमल निषादाशी असलेले जे संवादित्व याचे आकलन करीत जर त्याची आई बसली, तर तिला त्या संवादित्वाने आणि हुंदक्यांच्या समेने जो आनंद होईल तो सौंदर्यभावनेचा आनंद.''पण गवयाचेच मूल कोमल निषादात रडते काय? हा प्रश्न अस्वस्थ करतोय. भारतीय शास्त्रीय संगीतात निषादाचे दोन प्रकार सांगितले आहेत. कोमल निषाद आणि शुद्ध निषाद आणि ते गवयाचे मूल असल्यामुळे त्या रडण्यालाही कोमल निषादाचे भान असते काय ? मूळात मूल कोणाही आईचे असो- मग गायिका असो वा नाटकात दुष्ट खलनायिकेची भूमिका करणारी स्त्रीमधली आई असो, तिचे भुकेने व्याकुळलेले मूल रडायला लागले की तिला प्रथम वात्सल्याने दुथडी भरलेला पान्हाच फुटेल मग त्याचे रडणे कुठल्या निषादात मोडते वगैरे नंतर. सौंदर्य म्हणजे नेमके काय. सौंदर्य म्हणजे चित्ताला लाभणारा आल्हाद. वाड्मय कलाकृतीबद्दल बोलायाचे झाल्यास वाचकाला बोधात नेणे ही वाड्मयकृतीच्या गुणवैशिष्ट्याची एक बाजू तर आल्हादानंद निर्माण करणे ही दुसरी बाजू. आल्हाद सावलीच्या सुखासारखाही असतो. वृक्ष काटेरी असो वा विषारी अविषारी, त्याच्या सावलीचा गुणधर्म शीतलताच. म्हणून माणसानं एकदातरी स्वतःच्या सावलीशी संवाद करावा; खात्रीने सांगतोय, अंतःकरण आल्हादित होईल; उन्हात भिजणाऱ्या सावलीसारखं. आल्हाद म्हणजेच आनंद. संस्कृत साहित्यिक मम्मटाने म्हटलेय् की कवीची निर्मिती केवलानंदमयी असते. परंतु ज्ञानेश्वरादी संतांनी आनंदप्राप्ती प्रयोजनाला गौण मानले. कदाचित कलेपासूनची आनंद वा आल्हादप्राप्ती त्यांना मनोरंजनपर वाटली असावी. आल्हादानंदाने रसिकाला मनोविश्रांतस्थिती अनुभवता येते. कलेपासून मिळणारा बोधही आनंद रूपात सिद्ध हातो. हा आनंद सौंदर्यात्मकही असतो, आणि हाच शिवम् आणि सत्यमही असतो. या महाविश्वात सत्याइतुके अन्य दुसरे काही सुंदर नाही. पण सत्य कटू असते काय? नाही; सत्य फक्त सत्य असते आणि ते अंतर्मनाचे प्राणसत्त्व असते; सत्य एकाचवेळी सर्वांना मान्य होऊन प्रिय वाटेल असे घडत नाही. पण लोकाभिप्रायांशी सत्याचा संबंध नसतो. बर्नार्ड बोझंकिट यांनी सुंदर वस्तूंची तीन वैशिष्ट्ये सांगितली ती अशी-स्थिरता, संबद्धता आणिा सार्वत्रिकता. त्याने पुढे प्रतिकृतीच्या सौंदर्याचेही विश्लेषण केले आहे. मी नेणीवेचा डोह या माझ्या लेखात एका ठिकाणी म्हटले आहे की आरशात प्रतिबिंब पाहण्यात मग्न असलेल्या सुंदरीला जेव्हा ती प्रतिबिंबाहून अधिक सुंदर आहे याचं ज्या क्षणी भान येतं तोच सौंदर्यानुभूतीचा अद्भुत क्षण. कवी तर प्रतिबिंबांचा स्वप्नपारखी असतो. तपस्वी कवीला पिकलेली प्रतिबिंब पारखता येतात. म्हणूनच त्यातील गर्भार बियांमधून तो प्रयोगशील निर्मितीचं नंदनवन सतत फलवित असतो; असो. मर्ढेकर म्हणतात, सुंदर हे विशेषण आहे, ती वस्तू नाही. सुंदर या विशेषणापासून बनलेले सौंदर्य हे भाववाचक नाम आहे; हे बरोबरच आहे. आता एक वेगळा मुद्दा घेऊ या. आपण ज्याला कौरूप्य कुरूप म्हणतो, ती कुरूपता म्हणजे काय ? ढोबळमानाने रूपाविषयी बोलताना आपण सुंदर चेहरा आणि कुरूप चेहरा अशी वर्गवारी लावत असतो. विशेषकरून आपण गौरवर्णाला सौंदर्याचे प्रमाणपत्र देतो; पण ही वर्णवादी-वर्णवर्चस्ववादी गुणधारणा आहे. म्हणून काळ्या वर्णाच्या ऑफ्रिकन लोकानी ब्लॅक इज ब्युटीफुल ही सुंदरतेची मांडणी केली. बहुसंख्य मनुष्य समुदायाने रूढ केलेल्या संकल्पना सर्वदा ग्राह्य मानल्याच पाहिजे असे कदापि शक्य नाही. ताजमहल सर्वांनाच सुंदर वाटतो असे नाही. शकील बदायुनी हा थोर कवी म्हणतोय, इक शहंशाहने दौलत का सहारा लेकर, हम गरीबोंकी मोहब्बत का उड़ाया मजाक.'' म्हणजेच अमूक एक वस्तु ही सर्वमान्य सुंदर नसते; तशीच ती सार्वकालिक नसते; मग सत्य हे सुंदर असेल तर तेही वरीलप्रमाणे सर्वमान्य आणि सार्वकालिक नसते काय? पण वस्तुची सुंदरता आणि सत्याची सुंदरता यातला फरक कळायला हवा. जन्म आनंदोत्सवी असा सुंदर असला आणि मृत्यु दुखदायी आणि कुरूप असला तरी सत्य या दोहोंमधले अबाधित अशी सनातन सुंदरता आहे. निर्मिकाने निर्माण केलेले हे विश्व आणि त्यातील प्रत्येक निर्मिती ही मूळात सुंदर आहे. विनाश आणि निर्मिती निरंतर असून नवरूपधारिणी आहे; कारण आपण रेणूंपासून निर्माण होतो आणि रेणूंमध्येच विसर्जित होतो. हे संपूर्ण ब्रम्हांडही मर्त्य आहे; इथे अमर असे काहीही नाही. नाही अनंत नाही अनादी. हे सर्व मर्त्यच आहे हेच अंतिम सत्य आहे; आणि त्याची अभंग जाणीव सुंदर आहे. ज्याला हे उमगले तो जन्म आणि मृत्युमधला काळ आणि अवकाश मनाजोगा भोगून मृत्युला मित्र करू शकतो.



**सुधाकर गायधनी**
**नागपूर**

*(लेखक हे ख्यातनाम मराठी कवी, नाटककार आणि साहित्यिक आहेत. त्यांनी मराठी साहित्याला आधुनिक आणि वैश्विक दृष्टिकोन दिला असून, त्यांच्या कवितांमध्ये सामाजिक, धार्मिक आणि मानवी मूल्यांचा सखोल विचार आढळतो)*